स्मरणिका २०१७-१८

# जिजाऊ


## शैक्षणिक व सामाजिक संस्था

झडपोली, ता.विक्रमगड, जि.पालघर

समाजासाठी उभं राहायचंय

**आधारवड**

होण्यासाठी...



मा.श्री.निलेश भगवान सांबरे

संस्थापक

# -: अनुक्रमणिका :-


मनोगत................................................ ०४
ओमकार अंध व मतिमंद निवासी शाळा................. ०६
भावनादेवी भगवान सांबरे सीबीएसई स्कूल............. ०८
स्पर्धा परिक्षा वाचनालय.................................१२
मिशन अॅकॅडमी.........................................१३
मोफत वह्या वाटप.......................................१४
निस्वार्थ मदतीचा हात (शैक्षणिक).......................१५
श्री भगवान महादेव सांबरे रुग्णालय.....................१६
आरोग्य शिबीर..........................................१८
महारक्तदान शिबीर.....................................२०
निस्वार्थ मदतीचा हात (आरोग्य)........................२१
जी.के.करिअर अॅकॅडमी.................................२३
विशेष उल्लेखनीय (क्रिडा)............................... २४
क्रिडा.................................................... २६
महिला सक्षमीकरण...................................... ३०
कृषी......................................................३२
पाणी..................................................... ३४
कोकण विकास कामगार संघटना........................ ३६
आंदोलन................................................. ३८
अभियान.................................................४२
गौरव समाजकार्याचा....................................४५
ग्रेट भेट.................................................. ४६
हृदयस्पर्शी मनोगत....................................... ४८



**संस्थेचा कार्यालय पत्ता :**
ओमकार MPSC व UPSC केंद्र, झडपोली, (आशा निवासस्थानाशेजारी)
ता.विक्रमगड, जि.पालघर
संपर्क : ७२०८६१२२२२
**Website :** www.nileshsambare.org
**Facebook :** www.facebook.com/nileshsambare17



**लेखन /समन्वयक**
श्री. अजय शेलार

**अक्षर जुळणी व मांडणी**
मयुरी स्वप्निल करंदीकर
(स्पिनीफिक्स मिडीया)

रजि.नं.महा/३६५/०८/ठाणे व एफ/१८१०६/ठाणे

# आई
# बाबा

## केवळ
## तुमच्यासाठीच!



प्रस्थापित जमिनीवरचं रोपटं उचलून आपण चांगल्या ठिकाणी लावूही कदाचित
पण मुळांना चिकटून आलेली माती अशी सहजासहजी नाही झटकता येत ...
आई-बाबा, तुम्ही माझ्यावर केलेले संस्कार हे असेच आहेत.
मी लावलेल्या रोपटयाचा आज आधारवड होत आहे तो कितीही मोठा झाला
तरीही मातीशी असलेली त्याची नाळ तुटू नये.
आत रुजलेली तुमच्या संस्काराची पाळंमूळं
या वाढणाऱ्या आधारवडासह इथल्या मायमातीच्या कुशीत
अधिक दृढ होत जावोत हेच आशीर्वाद हवे आहेत...



ध्येय साध्य करणे कितीही कठीण असो जर आत्मविश्वास असेल तर अशक्य असे काहीच नाही.

||जिजाऊ||
शैक्षणिक व सामाजिक संस्था
एक आधारवड

# मी निलेश भगवान सांबरे ...



> एखाद्या खडकावर पडणा-या थेंब थेंब पाण्याने तो खडक फुटणार नाही. पण ठिसूळ नक्कीच होईल आणि येणा-या पिढीला फोडायला सोपा जाईल.

स्वातंत्र्याला ७० वर्ष उलटूनही आजही पालघर-ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागांत आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसारख्या प्राथमिक गरजांसाठी झगडावे लागत आहे. सरकारी शाळांची दुरावस्था आहे तर खाजगी शाळेची फी इथल्या सर्वसामान्य लोकांना न परवडण्यासारखी आहे. या शासनाचे वेगाने येणारे प्रकल्प इथल्या शेतक-यांवर जाणीवपूर्वक लादून त्यांच्या जमिनी बळकावत आहेत. त्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन त्यांना विस्थापित करत आहेत. ही सगळी परिस्थिती पाहत असताना लक्षात आले की इथल्या भूमिपुत्राला त्यांच्या हक्कांच्या प्रती जागरूक करणे गरजेचे आहे.

ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी एक एक मावळा जमवून गड कोट उभारत स्वराज्याचे रक्षण केले त्याचप्रमाणे संस्थेच्या माध्यमातून Playgroup पासून UPSC/ MPSC पर्यंत शिक्षण सुरु करण्यात आले असून इथल्या प्रत्येक युवकाला घडवत एक निकोप समाजाची निर्मिती हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून संस्था वाटचाल करत आहे. त्याचबरोबर पैसे नसल्याने आजाराने इथली माणसं आणि कुपोषणाने लहान लहान निरागस जीव पोखरली जात आहेत. म्हणूनच यापुढे इथल्या कुठल्याच माझा समाजबांधवाचा पैशाअभावी बळी जाता कामा नये. पालघर जिल्हा हा येत्या ५ वर्षात १००% कुपोषणमुक्त करण्याचा मानस आहे. आज खऱ्या ज्या लोकप्रतिनिधींकडून जनतेला आपले भले होईल अशी अपेक्षा होती ते

लोकप्रतिनिधी मात्र जनतेचा पैसा हा आपल्या वारसा हक्काचा असल्यासारखे स्वतःचे आणि आपल्या नातलगांचे भले करण्यात मश्गुल आहेत. मात्र जिजाऊ संस्था जनतेच्या न्याय हक्कांसाठी जिथे जिथे अन्याय होत आहे तिथे तिथे लढा उभारत आहे व या लढ्यामध्ये नव्याने अनेक माणसे संस्थेशी जोडली जात आहेत. हा संस्थेने आतापर्यंत केलेल्या प्रामाणिक कामांचा परिणाम आहे. आज इथल्या कुठल्याच शासकीय कार्यालयातला कागद पैशांचे वजन ठेवल्याशिवाय हलत नाही अशी परिस्थिती आहे म्हणूनच इथल्या सुस्तावलेल्या कारभारावर संस्थेने घडवलेले माझ्या ग्रामीण परिसरातले प्रामाणिक युवक असतील तेव्हाच खऱ्या अर्थाने आमच्या जिल्ह्याचा विकास होईल. संस्थेची वाटचाल ह्याच दृष्टीने होत असून त्यासाठी संस्था अहोरात्र कार्य करत आहे. इथले प्रशासन जर जनतेच्या पैशांचा वापर जर जनतेसाठी करत नसेल तर मग असे प्रशासन हवेच कशाला ?

ज्या स्वातंत्रसैनिकांनी रक्ताचे पाट वाहून आम्हांला स्वातंत्र्य मिळवून दिले त्या पुण्यात्मांना लाज वाटत असेल अशी अराजकता समाजात दिसून येत आहे. ग्रामसेवकांपासून मंत्र्यांपर्यंत भ्रष्टाचाराची कीड लागलेली आहे. समाजासाठी काम करत असताना माझ्या हातून किती मोठं कार्य होतंय हे मला माहित नाही. मात्र माझे प्रयत्न आणि हेतू प्रामाणिक आहे. दुर्गम भाग ही माझ्या जिल्ह्याची ओळख विकसित आणि प्रगतशील व्हावी यासाठी माझा आणि माझ्या संस्थेतील माझे हात झालेल्या सर्वांचाच ध्यास आहे. परिवर्तनाचं स्वप्न पाहत आज जिजाऊ संस्थेचे कार्य जोमाने चालू आहे.

मी एवढंच म्हणेन की एखाद्या खडकावर पडणा-या थेंब थेंब पाण्याने तो खडक फुटणार नाही. पण ठिसूळ नक्कीच होईल आणि येणा-या पिढीला फोडायला सोपा जाईल. जिजाऊ संस्थेच्या माध्यमातून इथल्या मातीतल्या सर्वसामान्य गोर-गरीब लोकांच्या आयुष्यातला अनेक समस्यांचा असलेला खडक फोडण्याचे आणि ठिसूळ करण्याचे काम प्रामाणिकपणे आम्ही करत आहोत.



# ओमकार अंध व मतीमंद निवासी शाळा

"मरावे परे किर्ती रुपी उरावे" याचे जिवंत उदाहरण म्हणजे पालघर जिल्ह्यात असलेली विक्रमगड तालुक्याच्या झडपोली गावातील जिजाऊ सामाजिक व शैक्षणिक संस्थेची ओमकार अंध व मतीमंद शाळा. निलेश सांबरे यांचे जवळचे स्नेही असलेल्या नरेश आक्रे यांचा एकुलता एक मुलगा ओमकार आक्रे ह्याला कोवळ्या वयातच अकाली मृत्यूने हे जग सोडावे लागले. मात्र त्याची १७ वयात असलेली सामाजिक दृष्टी निलेश सांबरे यांच्या मनात घर करून गेली आणि त्याच्याच नावाने मग उभी राहिली ती ओमकार अंध व मतीमंद शाळा. ओमकार आक्रे याच्या उपजत सामाजिक दृष्टीमुळे त्याच्या मृत्यु पश्चातही या शाळेतील अंध विद्यार्थ्यांच्या चैतन्य रुपाने निलेश सांबरे यांच्या जिजाऊ संस्थेने त्याला संजीवनी दिली आहे. १६ जून २०१६ साली स्थापन झालेल्या ओमकार अंध व मतीमंद शाळा आता विस्तारत चालली आहे. त्यावेळी या शाळेत ४० विद्यार्थी होते. आता त्यांची संख्या ५५ वर गेली आहे. भविष्यात इथे १०० मुलांची व्यवस्था करण्याचा मनोदय आहे. यातील महाविद्यालयीन शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचीही निवासी व मार्गदर्शनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या शाळेतील मुलांना रोजच्या जगण्यात, व्यवहारात येणा-या अडचणींना कसे सामोरे जावे हे शिकविले जाते. इथले अनुकूल वातावरण त्यांच्या गुणवत्तावाढीस देखील उपयुक्त ठरत आहे. त्याच अनुषंगाने स्पर्धा परीक्षांसाठी देखील त्यांना सक्षम करून ही मुले भविष्यात अधिकारी म्हणून घडतील असे प्रयत्न संस्थेचे राहणार आहेत.



आपल्या नियतीचे मालिक बना पण परिस्थितीचे गुलाम बनू नका.

||जिजाऊ|| शैक्षणिक व सामाजिक संस्था एक आधारवड

# ओमकार अंध व मतीमंद शाळा



शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देश्याने संगीताचेही धडे त्यांना इथे दिले जात आहे. यातील २ विद्यार्थिनी गायनाची तिसरी तसेच इतर दोन मुली तबल्याची ४ थी परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. क्रीडा क्षेत्रातही या शाळेने केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत एकूण १० विशेष शाळांचा सामावेश होता त्यापैकी प्रथम व व्दितीय अशी एकूण ३० पारितोषिकांवर जिजाऊ संस्थेच्या ओमकार अंध व मतीमंद शाळेने विजयी मोहर उमटवली आहे.

बुद्धिबळ स्पर्धेसाठीही त्यांची तयारी चालू असून विविध कौशल्य ही मुलं प्राप्त करत आहेत. त्याचबरोबर हस्तकला प्रशिक्षण, संगणक प्रशिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण, क्रिकेट टीम यांसारखे उपक्रम राबवून त्यांना स्वावलंबी, सक्षम बनवून भविष्यात तळागाळांतील शक्य तेवढ्या सर्व अंध मतीमंद बांधवांसाठी सहकार्याचा हात देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा संस्थेचा मानस आहे.

ओमकार अंध व मतीमंद शाळा हा जिजाऊ संस्थेचा प्रकल्प संस्थापक निलेश सांबरे यांच्या अत्यंत हृदयाच्या जवळचा प्रकल्प आहे. या मुलांकडे त्यांचे विशेष असे लक्ष असते. सगळे सण-उत्सव तसेच महापुरुषांच्या जयंत्या येथे साजऱ्या केल्या जातात. या शाळेतील अंध विद्यार्थीनींकडून दरवर्षी राखी बांधून ते रक्षाबंधन साजरा करतात. सांबरे यांच्या मातोश्रींचा वाढदिवस देखील ह्याच मुलांच्या सोबत मोठ्या आनंदात साजरा केला जातो.

या शाळेतून बाहेर पडताना येथील विद्यार्थी सर्वार्थाने सक्षम असायला हवा, तसा तो घडावा म्हणून निलेश सांबरे या प्रकल्पाकडे जातीने लक्ष देतात.







कोणतेही कार्य अडथळ्यापासून पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करीत राहतात त्यांनाच यश प्राप्त होते.

# सौ. भावनादेवी भगवान सांबरे CBSE स्कूल

समाजातील दुर्बल घटकांसाठी उच्च गुणवत्तेचे शिक्षण मिळावे, केवळ पैशांअभावी त्यांच्यातील वारंवार डावलण्यात येणारी क्षमता यामुळे होणारे विद्यार्थ्यांचे खच्चीकरण थांबावे आणि गरीब दुर्गम खेड्यापाडयातल्या मुलांनाही इतर मुलांबरोबर मुख्य प्रवाहात येता यावे यासाठी पूर्वी विक्रमगड येथे जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या आईच्या नावाने असलेली सौ. भावनादेवी भगवान सांबरे सीबीएससी स्कूल आता संस्थेच्या स्वतः च्या हक्काच्या जागेत प्रशस्त आणि अद्यावत सुविधेसह उभी राहिली आहे. यातील ८० टक्के विद्यार्थी हे आदिवासी कुटुंबातील आहेत. सध्या Playgroup ते ४थी पर्यंत ५४० विद्यार्थी या शाळेत मोफत शिक्षण घेत असून येणा-या चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी चा वर्ग चालू होणार आहे. त्याचबरोबर शैक्षणिक प्रक्रियेतील अभिनव पद्धतींचा वापर करून येथे अध्यापन केले जात आहे. ऑक्सफर्ड बुक्सचा वापर करून तीन विभागांत अभ्यासक्रम विभागला गेल्याने मुलांचे पुस्तकांचे ओझे कमी झाले आहे. त्याचबरोबर डिजीटल पध्दतीचा वापर केल्याने मुलांना अधिक सोप्या आणि चांगल्याप्रकारे ज्ञान आत्मसात करता येत आहे. त्यामुळे केवळ पालघर जिल्ह्यातीलच नव्हे तर भारत देशातील उच्च गुणवत्तेचे मोफत सीबीएससी शिक्षण देणारी ही एकमेव शाळा ठरली. सीबीएससी शाळेचा पूर्वाअनुभव असलेले अनुभवी शिक्षक या शाळेत नियुक्त केलेले आहेत.

येथील शिक्षक गायन, चित्रकला, नृत्य, वाद्य अश्या कलाक्षेत्रात सुप्त गुण असलेल्या विद्यार्थ्यांचे शाळेत लावलेल्या सीसीटिव्हीच्या देखरेखेखाली निरीक्षण करून पालकांशी त्याबाबत संवाद साधतात. याआधी परिस्थितीमुळे इथला विकासगंगेपासून कोसो मैल दूर असलेला आदिवासी बांधव अशा शाळेचे स्वप्न पाहू शकत नव्हता. मात्र निलेश सांबरे यांनी जिजाऊ सामाजिक आणि शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून जेव्हा सौ.भावनादेवी भगवान सांबरे सीबीएससी स्कूलची वास्तु उभारली आणि येथील सर्वांसाठी प्रथम येईल त्याला प्राधान्य यानुसार मोफत शिक्षण चालू केले तेव्हापासून इथला सामान्यातला सामान्य माणूसही आता त्याच्या पाल्याला दर्जेदार शिक्षण देऊन अधिकारी बनवण्याचे स्वप्न पाहू लागला आहे. त्याचबरोबर या शाळेतून बाहेर पडणारा विद्यार्थी हा सुसंस्कृत माणूस म्हणूनच बाहेर पडावा याच सामाजिक दायित्वाच्या भावनेतून ही शाळा समाजासाठी उभी राहिली आहे. त्याच भावनेतून इथे घडणा-या विद्यार्थ्याने सामाजिक भान जपावे यासाठी त्यांच्यावर तसे संस्कार केले जात आहेत. शैक्षणिक क्षेत्रात सर्वत्र माजलेले बाजारीकरण या शाळेच्या माध्यमातून निलेश सांबरे यांनी मोडीत काढले आहेत. आर्थिक कुवत नसलेल्या गरजू विद्यार्थ्याची होमविझीट करून सर्वेक्षण करून अश्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक जबाबदारी संस्था उचलत आहे. JEE/ NEET यांसारखे महागडे अभ्यासक्रमाचे शिक्षण येथील गुणवत्ता असलेला मात्र आर्थिक बाजू कमकुवत असलेला विद्यार्थी घेऊ शकत नाही हे ओळखून अश्या १०० विद्यार्थ्यांची निवड करून संस्थेच्यावतीने त्यांच्या शिक्षणाचा व वसतिगृहाचा सगळा खर्च उचलण्यात आलेला आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातल्या धोरणाप्रमाणे हे शिवकार्य चालू असल्याच्या भावना पालक येऊन शाळेतील शिक्षक वर्गाकडे व्यक्त करत आहेत असे ह्या शाळेतील शिक्षक आर्वजून सांगतात.



Education is the most powerful weapon. We can use do change the world.




गुणवत्तेच्या निकषावर  संपूर्ण महाराष्ट्राला हेवा वाटेल अशी ही शाळा घडवायची असे संस्थापक निलेश सांबरे यांचे भविष्यातील स्वप्न आहे.



# सकाळ चित्रकला स्पर्धा
# सीबीएसई मुलांचे घवघवीत यश

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता सकाळ समूहाद्वारे भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. या चित्रकला स्पर्धेत संस्थापक निलेश भगवान सांबरे संचालित सौ.भावनादेवी भगवान सांबरे सी.बी.एस.ई. स्कुलमधील विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केलं आहे. जयेश पवार इयत्ता-२री हा अ गटात विक्रमगड तालुक्यात प्रथम आला. तसेच द्वितीय-श्रावणी गायकवाड, तृतीय-लावण्या कांगणे इत्यादी विद्यार्थ्यांनी यश संपादित केलं. ब गटात विक्रमगड तालुक्यातून द्वितीय-निधी भानुशाली, तृतीय-अनुष्का राजोरे या विद्यार्थ्यांनी यश संपादित केलं.

शाळेतील २९ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. त्यापैकी १३ विद्यार्थ्यांनी यश संपादित केलं आहे. संस्थापक निलेश भगवान सांबरे यांच्या विश्व संकल्पनेतून व ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेविषयी असणाऱ्या तळमळीतून ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांकरिता ह्या शाळेची निर्मिती झाली आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर आपले कला गुण जोपासले पाहिजेत व विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्याकरिता आपली शाळा नेहमी वेगवेगळे उपक्रम राबवत आहे.

